E 3541796

| | | |
|---|---|---|
| | **जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय**<br>**आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, नांदेड** | |
| **Ph. No- 02462-234614** | | **Email ID-**dhonanded4@gmail.com, dpm.nanded1@gmail.com |
| **आरोग्य सेवा** | | जा.क्र.जिपना/आरोग्य/राआअ/आस्था/6039 /२०२६<br>दि. 12 AUG 2026 |

## NHM व NUHM Council १० वर्ष व त्यापेक्षा कंत्राटी सेवा पुर्ण झालेल्या पात्र कर्मचाऱ्यांची अंतिम यादीबाबत सुचना

मा.सहसंचालक(अ) रा.आ.अ.,मुंबई यांचे पत्र प्राप्त झाले असून सदरपत्रामध्ये राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या सेवा समायोजनाच्या अनुषंगाने शासनाने दि.३०/०६/२०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. सदर शासन निर्णयानुसार राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत तांत्रिक खंड वगळून दि.२५/०६/२०२६ रोजी १० वर्षे व त्यापेक्षा अधिक कंत्राटी सेवा पूर्ण करणाऱ्या पात्र कर्मचाऱ्यांना एक वेळची विशेष बाब म्हणून समकक्ष वेतन श्रेणीतील अधिसंख्य पद निर्माण करुन नियुक्ती देण्यास मान्यता देण्यात आली आहे. मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा आरोग्य संचालक रा.आ.अ मुंबई यांचे दि.२३/०७/२०२६ रोजीच्या पत्रान्वये दि. २५/०६/२०२६ रोजी पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत १० वर्ष पूर्ण झालेल्या कत्राटी अधिकारी/कर्मचारी यांची यादी दि. २७/०७/२०२६ रोजी संबंधी कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर प्रकाशित करण्याबाबत आक्षेपाचे निराकरण करुन अंतिम यादी प्रकाशित करण्याबाबत आदेशित करण्यात आलेले आहे. तसेच मा. आयुक्त आरोग्य सेवा तथा आरोग्य संचालक रा.आ.अ मुंबई यांचे दि.२३/०७/२०२६ रोजीच्या पत्रानुसार दि.२५/०६/२०२६ रोजी वयाची ५८ वर्ष (सेवानिवृत्ती वय) पूर्ण केलेल्या कर्मचारी यांना यादीतुन वगळण्याबाबत राज्यस्तरावरुन सुचना प्राप्त आहेत.

त्याअनुषांने संदर्भिय पत्रान्वये अंतिम यादी आज दि.१२/०८/२०२६ रोजी नांदेड जिल्हा परिषदेचे www.zpnanded.in या संकेतस्थळावर तसेच कार्यालयाच्या नोटिस बोर्डवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**सदस्य सचिव, जिल्हा एकात्मिक**
**आरोग्य कु.क. सोसायटी तथा**
**जिल्हा आरोग्य अधिकारी,**
**जिल्हा परिषद, नांदेड.**